Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-VII July 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील ग्रंथपाल व इतर शिक्षकांमधिल समन्वयाचा चिकित्सक अभ्यास

दिनकर भा. तायवाडे
नुतन आदर्श आर्ट, कॉमर्स आणि श्रीमती म. ह. वेगड विज्ञान महाविद्यालय,
उमरेड, जि. नागपूर

## १.० प्रस्तावना

प्राचीन कालापासून ज्ञानसंग्रह आणि ज्ञानप्रसार हे प्रामुख्याने ग्रंथालयाचे प्रधान कार्य मानले गेले आहे. ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था असुन ग्रंथालयसेवेद्वारे ग्रंथालय एक प्रकारचे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत असते. ग्रंथालयाचा परिसर, भाषिक गट, सांस्कृतिक पार्श्वभूमी, शैक्षणिक गरजा या सर्व बाबींचा विचार, ग्रंथालय – सेवेची तरतूद करताना करणे आवश्यक असते. जगात जसजसा संदर्भ साधनांचा विकास होत गेला तसतशी ग्रंथपालाची भूमिका बदलत गेलेली आहे. ग्रंथालय शास्त्राच्या सूत्रानुसार प्रत्येक ग्रंथास त्याचा वाचक मिळाला पाहिजे रंगनाथन (१९८९). त्यात माहितीच्या विस्फोटामुळे ग्रंथालयामध्ये ग्रंथ आणि नियतकालीकांखेरीज अन्य ज्ञानसाधनांचा समावेश देखील होउ लागला. ग्रंथालयातील साहित्यांची संख्या जोपर्यंत मर्यादित होती, तोपर्यंत तेथील सेवकवर्ग त्यांच्या स्मरणशक्तीनुसार आपल्या ग्रंथालयातील ज्ञानसाधने गरजू वाचकांना देऊ शकते असे ग्रंथालयातील प्रत्येक कार्य नियोजन पध्दतीने आणि कमी वेळात कसे केले जाईल याचा विचार सुरू झाला (फेरेट व मारसिनेक (१९९९).

साधारणत: ग्रंथालय ही एक सेवाभावी संस्था आहे व ग्रंथालयाचे व्यवस्थापन, ग्रंथालय कर्मचाऱ्यांमधिल समन्वय, विद्यालयातील शिक्षकांची भूमिका इत्यादि बाबींवर ग्रंथालयाचा विकास अवलंबुन असतो (बेदी व वाल्दे (२०१७). ग्रंथालय व्यवस्थापनाची मूलतत्त्वे म्हणजेच मूलभूत सत्य, वस्तुस्थिती, मूलभूत घटक. व्यवस्थापनाची तत्वे, व्यवस्थापन या विषयाला शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून देतात. ही तत्वे सातत्याने येणाऱ्या अनुभवावरून मांडली जातात. व्यवस्थापनाची तत्त्वे (प्रस्तुत संशोधनकार्यात ग्रंथपाल व इतर शिक्षकांमधील समन्वय) ही मानवी वर्तणुकीबाबत स्पष्टीकरण देतात. त्यामुळे या तत्त्वात गणिती दर्जाचा अचूकपणा व नेमकेपणा नसतो (भागवत, २०१२). ग्रंथपाल व इतर शिक्षकांमधील समन्वय ग्रंथालयातील कार्यक्षमतेत वाढ होण्यासाठी, ग्रंथालयीन सेवांची उद्दिष्ट–पूर्ती होण्यासाठी आवश्यक आहे. यामुळे किमान प्रयत्नात कमाल फलश्रुती साध्य होते व वेळ, पैसा, श्रम यांचा अपव्यय टाळला जातो (गाय व इमर, २०१६).

कोणत्याही संस्थेतील कामकाज हे संघवृत्तीने केले जाते व ग्रंथालय याला अपवाद नाही. संस्थेच्या विविध विभागांचे परस्पर संबंध सलोख्याचे हवेत. विविध कार्यकरणाऱ्या कर्मचाऱ्यांना जबाबदारीची जाणीव असायला हवी. एकसंधपणा, समन्वय साधणे यातच व्यवस्थापकांच्या, अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागत असते (लथाम व सहकारी, २०१६). ज्या प्रमाणे ग्रंथपालाचे कार्य महत्वाचे आहे, त्याचप्रमाणे इतर शिक्षकांची देखील माहिती मिळविण्यात महत्वाची भूमिका आहे. एकंदरीत पाहता ग्रंथपालामधील नेतृत्व गुण व त्याची इतर

शिक्षकांसोगत समन्वय स्थापन करून या संबंधांच्या मार्फत ग्रंथालयातील संदर्भ साधनांचा विकास करणे अपेक्षित आहे. आजच्या माहिती युगात ग्रंथालयामध्ये येणारा वाचक वर्ग व कर्मचारी यांच्यामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. प्राध्यापक, शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि संशोधक यांना प्रेरित करण्यासाठी त्यांच्या विषयातील माहिती त्यांच्या समोर पोहचविण्यासाठी ग्रंथपालात समन्वय क्षमता या गुणाची आवश्यकता असते. थोडक्यात ग्रंथपाल व शिक्षक यांच्यामधील समन्वय क्षमतेची आवश्यकता महाविद्यालयाच्या विकासासाठी फार महत्वपूर्ण आहे याकरीता हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

## २.० संशोधन पद्धती

या संशोधनाची उद्देशपूर्ती होण्यासाठी प्रमाणिकृत संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला. संशोधन कार्यात माहिती मिळण्यासाठी संशोधनाची उद्दिष्टये अभ्यासून त्यानुसार संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करुन प्रश्नावलीच्या माध्यमातुन तथ्य संकलन करण्यात आले.

### २.१ संशोधनाचे कार्यक्षेत्र :

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचील निवड केली आहे. त्याअनुसार विदर्भातील नागपुर, वर्धा, भंडारा व गोंदीया या जिल्ह्यांची संशोधन क्षेत्र म्हणून निवड केली.

### २.२ अध्ययन विश्व, जनसंख्या, नमुना निवड व न्यादर्श

प्रस्तूत अध्ययनात वर नमुद केलेल्या सर्व जिल्ह्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयीन ग्रंथालयांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला व या महाविद्यालयातील सर्व ग्रंथपालांचा जनसंख्या म्हणून विचार करण्यात आला. या संशोधनकार्यात संभाव्यता पद्धतीतील साधा यादृच्छिक नमुना पद्धतीने निवडण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी एकूण ३६० एककांची न्यादर्श म्हणुन निवड करण्यात आली.

### २.३ प्राथमिक तथ्य संकलन

संशोधनाकरिता आवश्यक असलेली माहिती संकलित करण्याकरिता प्रश्नावली या साधनाचा उपयोग करण्यात आला. निवडण्यात आलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयातील ग्रंथपाल व इतर शिक्षकांमधिल समन्वय संबंधी माहिती स्वनिर्मित प्रश्नावली द्वारे प्राप्त करण्यात आली. अध्ययनाच्या उद्दिष्टांना अनुसरून व वापर करून प्रश्नावली तयार करण्यात आली.

### २.४ संशोधन आराखडा व सांख्यिकिय विश्लेषण

प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखड्याची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन करून आलेख, विवेचन व पृथ:करण व सांख्यकीय विश्लेषण करण्यात आले. प्राप्त झालेल्या माहितीचे सांख्यकिय विश्लेषण करण्याकरीता SPSS 18.0 या सॉफ्टवेअरचा उपयोग करण्यात आला. प्राप्त माहितीवरुन वारंवारिता (Frequency) व बहुलक (Mode) काढण्यात आले. त्याचप्रमाणे माहितीच्या विश्लेषणाकरिता 'Chi-Square' test चा वापर करण्यात आला. Significance Level 0.05 निर्धारीत करण्यात आली.

## ३.० तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन

### ३.१ ग्रंथालयीन कार्यानुभव

**सारणी क्र. १:** महाविद्यालयातील ग्रंथपालांचा कार्यानुभव

| अनुभव वर्षे | ग्रंथपालांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| **१० वर्षांपेक्षा कमी** | ८२ | २२.८ |
| **१० ते २० वर्षे** | ५८ | १६.१ |
| **२० ते ३० वर्षे** | १७६ | ४८.९ |
| **३० वर्षांपेक्षा अधिक** | ४४ | १२.२ |
| **एकूण** | **३६०** | **१००.०** |

वरील सारणी क्र. १ मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील ग्रंथपालांच्या ग्रंथालयीन अनुभवासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ४८.९ टक्के ग्रंथपालांना २० ते ३० वर्षांचा ग्रंथालयीन अनुभव असून २२.८ टक्के ग्रंथपालांना १० वर्षांपेक्षा कमी ग्रंथालयीन अनुभव आहे. तसेच १६.१ टक्के ग्रंथपालांना १० ते २० वर्षे व १२.२ टक्के ग्रंथपालांना ३० वर्षांपेक्षा अधिक ग्रंथालयील अनुभव असल्याचे आढळले.

### ३.२ ग्रंथपाल व प्राध्यपकांमधील समन्वयाचा लाभ याविषयी जागरूकता

**सारणी क्र. २:** ग्रंथपाल व प्राध्यपकांमध्ये असलेल्या समन्वयाच्या फायद्यांविषयी पुर्णपणे जागरूकता

| प्रतिक्रिया | ग्रंथपालांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| **होय** | ११६ | ३२.२ |
| **नाही** | १९४ | ५३.९ |
| **सांगता येत नाही** | ५० | १३.९ |
| **एकूण** | **३६०** | **१००.०** |

वरील सारणी क्र. २ मध्ये ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयाच्या फायद्यांविषयी पुर्णपणे जागरूक असण्यासंबंधी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ५३.९ टक्के ग्रंथपाल, ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयाच्या फायद्यांविषयी पुर्णपणे जागरूक नसून ३२.२ टक्के ग्रंथपाल समन्वयाच्या फायद्यांविषयी पूर्णपणे जागरूक आहेत. ग्रंथपाल व प्राध्यपकांमध्ये असलेल्या समन्वयाच्या फायद्यांविषयी पुर्णपणे जागरूक असण्यासंबंधी सांगता येत नाही ही प्रतिक्रिया नमूद करणाऱ्या ग्रंथपालांचे शेकडा प्रमाण १३.९ टक्के असल्याचे निदर्शनास आले.

### ३.३ ग्रंथपाल व प्राध्यापकांमधील समन्वयात सुधारणा घडविण्याकरिता विशिष्ठ प्रणाली

**सारणी क्र. ३:** शैक्षणिक संस्थेत ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयात सुधारणा घडविण्याकरिता विशिष्ठ प्रणालीची व्यवस्था

| प्रतिक्रिया | ग्रंथपालांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३४ | ९.४ |
| नाही | २९४ | ८१.७ |
| माहिती नाही | ३२ | ८.९ |
| **एकूण** | **३६०** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ३ मध्ये शैक्षणिक संस्थेत ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयात सुधारणा घडविण्याकरिता विशिष्ठ प्रणालीची व्यवस्था केली असण्यासंबंधी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८१.७ टक्के ग्रंथपालांच्या मते त्यांच्या शैक्षणिक संस्थेत ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयात सुधारणा घडविण्याकरिता विशिष्ट प्रणालीची व्यवस्था केली नसून व्यवस्था केली आहे हे नमूद करणाऱ्या ग्रंथपालांचे शेकडा प्रमाण ९.४ टक्के आहे. तसेच वरील विधानासंबंधी माहिती नाही हे नमूद करणाऱ्या ग्रंथपालांचे शेकडा प्रमाण ८.९ टक्के असल्याचे निदर्शनास आले.

### ३.४ ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयासंबंधी समाधान

**सारणी क्र. ४:** शैक्षणिक संस्थेतील ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयासंबंधी समाधान

| प्रतिक्रिया | ग्रंथपालांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| पूर्णत: सहमत | ४४ | १२.२ |
| काही प्रमाणात सहमत | ६२ | १७.२ |
| अंशत: सहमत | ९८ | २७.२ |
| काही प्रमाणात असहमत | १४० | ३८.९ |
| पूर्णत: असहमत | १६ | ४.४ |
| **एकूण** | **३६०** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ४ मध्ये शैक्षणिक संस्थेतील ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयासंबंधी समाधानी असण्याबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथपालांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३८.९ टक्के ग्रंथपाल शैक्षणिक संस्थेतील ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयासंबंधी काही प्रमाणात असहमत असून २७.२ टक्के ग्रंथपाल अंशत: सहमत असल्याचे आढळले. तसेच १७.२ टक्के ग्रंथपाल वरील विधानासंबंधी काही प्रमाणात सहमत असून १२.२ टक्के ग्रंथपाल पूर्णत: सहमत असल्याचे आढळले. तसेच शैक्षणिक संस्थेतील ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयासंबंधी समाधानी असण्याबाबत पूर्णत: असहमत असणाऱ्या ग्रंथपालांचे शेकडा प्रमाण केवळ ४.४ टक्के असल्याचे निदर्शनास आले.

### ३.५ प्राध्यापकांशी समन्वय साधतांना ग्रंथपालांना येणाऱ्या समस्या

**सारणी क्र. ५:** ग्रंथालय सेवांमध्ये सुधारणा घडवितांना प्राध्यापकांशी समन्वय साधण्यात येणाऱ्या समस्या

| समस्या | ग्रंथपालांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| संवादकरिता वेळ जुळत नसणे | २६४ | ७३.३ |
| प्राध्यापकांमध्ये पुस्तक व इतर साहित्यांच्या तांत्रिक ज्ञानाविषयी असलेले अज्ञान | २०४ | ५६.७ |
| कार्याची गोपनियता | १३९ | ३८.६ |
| ग्रंथालयाप्रती प्राध्यापकांची उदासीन अभिवृत्ती | ३२० | ८८.९ |

वरील सारणी क्र. ५ मध्ये ग्रंथालय संग्रह व सेवांमध्ये सुधारणा घडवितांना प्राध्यापकांशी समन्वय साधण्यात येणाऱ्या समस्यासंबंधी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथपालांची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ८८.९ टक्के ग्रंथपालांना ग्रंथालय संग्रह व सेवांमध्ये सुधारणा घडवितांना प्राध्यापकांशी समन्वय साधताना ग्रंथालयाप्रती प्राध्यापकांच्या उदासीन अभिवृत्तीचा सामना करावा लागला असून ७३.३ टक्के ग्रंथपालांचा संवादाकरिता वेळ जुळत नसल्याचे आढळले. तसेच ५६.७ टक्के ग्रंथपालांना प्राध्यापकांमध्ये पुस्तक व इतर साहित्यांच्या तांत्रिक ज्ञानाविषयी असलेले अज्ञान याचा सामना करावा लागला असून ३८.६ टक्के ग्रंथपालांना कार्याची गोपनियता ठेवावी लागली.

## ४.० निष्कर्ष

### ४.१ ग्रंथालयीन कार्यानुभव

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश महाविद्यालयातील ग्रंथपालांना २० ते ३० वर्षाचा ग्रंथालयीन अनुभव आहे.

### ४.२ ग्रंथपाल व प्राध्यपकांमधील समन्वयाच्या फायद्यांविषयी जागरूकता

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश महाविद्यालयीन ग्रंथपाल, ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयाच्या फायद्यांविषयी पुर्णपणे जागरूक नाहीत.

### ४.३ ग्रंथपाल व प्राध्यापकांमधील समन्वयात सुधारणा घडविण्याकरिता विशिष्ठ प्रणालीची व्यवस्था

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश ग्रंथपालांच्या मते त्यांच्या शैक्षणिक संस्थेत ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयात सुधारणा घडविण्याकरिता विशिष्ठ प्रणालीची व्यवस्था केली नाही.

### ४.४ शैक्षणिक संस्थेतील ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयासंबंधी समाधान

- अध्ययनात प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश महाविद्यालयीन ग्रंथपाल शैक्षणिक संस्थेतील ग्रंथपाल व प्राध्यापकांमध्ये असलेल्या समन्वयासंबंधी काही प्रमाणात असहमत आहेत.

### ४.५ प्राध्यापकांशी समन्वय साधतांना ग्रंथपालांना येणाऱ्या समस्या

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश महाविद्यालयीन ग्रंथपालांना ग्रंथालय संग्रह व सेवांमध्ये सुधारणा घडवितांना प्राध्यापकांशी समन्वय साधताना ग्रंथालयाप्रती प्राध्यापकांच्या उदासीन अभिवृत्तीचा सामना करावा लागला.

## ५.० संदर्भ ग्रंथसूची

१. कदम सी. पी., (१९९४) शैक्षणिक संख्याशास्त्र गो.के. जोगळेकर, नुतन प्रकाशन २१८१ सदाशिव पेठ, पुणे.

२. कऱ्हाडे, बी. एम., (२००७) शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापूरे अॅन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

३. कुंभार, रा., (२०००), 'महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये' नाशिक य.च. म. मु. विद्यापीठ.

४. पवार, एस.पी. व इतर, (२००२) ग्रंथालय माहितीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. बोधनकर, सु., (२००३) सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

६. भागवत श. गं., (२०१२) ग्रंथालय व्यवस्थापन, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, पृष्ठ १

७. रंगनाथन, एस. आर., (१९८९), 'लायब्ररी बुक सिलेक्शन'. २ री आवृत्ती, बंगलोर, शारदा रंगनाथन, इन्डोमेंट फॉर लायब्ररी सायन्स.

८. सातारकर, सु.प्र. (२००६) ग्रंथालय तंत्र व मंत्र. नांदेड., अमेय प्रकाशन

९. Bedi, S and Walde, C. (2017). Transforming Roles: Canadian Academic Librarians Embedded in Faculty Research Projects, College research & libraries.

१०. Feret, B and Marcinek, M. (1999). The future of the academic library and the academic librarian: a Delphi study", Librarian Career Development, 7(10), pp.91 – 107.

११. Guy, A and Eimer, L. (2016). Advisors, Faculty, and Librarians: Collaborating for Student Success, Journal of Library & Information Services in Distance Learning, pp. 1-5.

१२. Latham, D., Julien, H., Gross, M and Witte, S.(2016). The role of inter-professional collaboration to support science learning: An exploratory study of the perceptions and experiences of science teachers, public librarians, and school librarians, Library & Information Science Research.